# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः19.04.2025** **वारःशनिवार**

---

1. चापेकर बंधूंचं स्मारक युवकांना देशभक्तीचे संस्कार देणारं ठरेल-मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला विश्वास
2. युनेस्कोच्या जागतिक वारसा नोंदींमध्ये श्रीमद् भगवद्गीता आणि भरत मुनींच्या नाट्यशास्त्राचा समावेश
3. भारतीय वायु दलातील अधिकारी ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला पुढच्या महिन्यात आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणार
4. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांचं राज्यपालांच्या हस्ते काल पुण्यात वितरण आणि
5. तिळाच्या टीएलटी-10 या वाणाला देशपातळीवर अधिकृत मान्यता

**चापेकर स्मारक-मुख्यमंत्री**

चापेकर बंधूंचं स्वातंत्र्य लढ्यातलं योगदान अमूल्य आहे. त्यांचं स्मारक खऱ्या अर्थानं युवकांना देशभक्तीचे संस्कार देणारं ठरेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. चिंचवड इथल्या क्रांतीवीर चापेकर स्मारकाचं लोकार्पण आणि राष्ट्रीय संग्रहालयाच्या कामाचा प्रारंभ काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. भारताचा सुवर्णमय इतिहास या स्मारकातून पाहायला मिळेल असं सांगून मुख्यमंत्री म्हणाले.....

**भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात चापेकर बंधूंनी केलेला रँडचा वध हा क्रांतिकारकांच्या इतिहासामध्ये वॉटर शेड मूव्हमेंट आहे, की ज्यातला इतिहास पूर्णपणे बदलला आणि त्यानंतर क्रांतिकारकांची एक मोठी पिढी आपण त्या ठिकाणी बघतोय, की ज्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरता अतिशय चांगलं काम केलं. खरं म्हणजे देशाचे प्रधानमंत्री माननीय नरेंद्र मोदीजी यांचे मी आभार मानेन कारण दुर्दैवाने केवळ बोटावर मोजण्या इतक्या क्रांतिकारकांच्या गाथा आपल्याला माहिती होत्या, पण मोदीजींनी देशभरामधल्या साडेबारा हजार क्रांतिकारकांच्या कथा आणि गाथा या शोधून काढल्या आणि त्या आपल्यापर्यंत पोहोचवल्या आणि हे स्वातंत्र्य आपल्याला मोफत मिळालेलं नाही. या स्वातंत्र्याकरता किती बलिदान दिलेलं आहे किती लोकांनी स्वतःच्या प्राणाचं अर्पण केलेलं आहे हे देखील यातनं आपल्या नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचं काम हे मोदीजींनी केलेलं आहे.**

उपमुख्यमंत्री अजित पवार या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. समाजसुधारकांच्या आणि क्रांतिकारकांच्या सेवा, त्याग, समर्पणातून आपला देश घडला आहे. त्यांच्यामुळे मिळालेलं स्वातंत्र्य अखंड राखणं, संविधानिक मूल्यांचं संरक्षण करणं आणि विविधतेमध्ये असलेली एकता जपणं, हे आपलं कर्तव्य आहे असं पवार यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाला राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्यासह अन्य मान्यवर आणि क्रांतीवीर चापेकर, सरसेनापती हंबीरराव मोहिते, आद्य क्रांतीवीर राजे उमाजी नाईक, हुतात्मा राजगुरू यांचे वंशज उपस्थित होते.

**युनेस्को गीता**

युनेस्कोच्या मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टरमध्ये म्हणजेच जागतिक महत्त्वाच्या आणि उत्कृष्ट वैश्विक मूल्ये असलेल्या वारसा नोंदींमध्ये आता श्रीमद् भगवद्गीता आणि भरत मुनींच्या नाट्यशास्त्राचा समावेश करण्यात आला आहे. यांतील दोन हजार

वर्षांपूर्वी रचलेल्या भरतमुनींच्या नाट्यशास्त्र या ग्रंथाचं एक हस्तलिखित तसंच भगवद्गीतेची काश्मीरी शारदा लिपीतील पाच हस्तलिखितं पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरातील आहेत.

दरम्यान, भारताची कालातीत विद्वत्ता आणि समृद्ध संस्कृती यांना मिळालेली ही जागतिक मान्यता आहे अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. गीता आणि नाट्यशास्त्र या दोन्ही ग्रंथांनी शतकानुशतकं संस्कृती आणि सद्सद् विवेकबुद्धी जोपासण्याचं काम केलं आहे. हे ग्रंथ यापुढेही जगाला प्रेरणा देत राहतील असं मोदींनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>अंतराळ मोहीम</u>**

भारत आता अंतराळ क्षेत्रातल्या आपल्या ऐतिहासिक यशाची पुनरावृत्ती करण्यास सज्ज आहे. आंतरराष्ट्रीय अंतरिक्ष मोहीमेअंतर्गत भारतीय अंतराळवीर पुढच्या महिन्यात आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणार आहे. भारतीय वायु दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आगामी ऍक्झिऑम अंतराळ मोहीमेत सहभागी होतील अशी माहिती अंतराळ आणि अणु उर्जा राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंग यांनी काल दिली. या मोहीमेद्वारे भारतीय अंतराळ क्षेत्रात एक नवा अध्याय लिहीला जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. इस्रोच्या आगामी योजनांच्या उच्च स्तरीय आढावा बैठकीनंतर ते नवी दिल्लीत बोलत होते.

**<u>राजनाथ सिंह</u>**

संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी काल छत्रपती संभाजीनगरमध्ये उद्योजकांशी संवाद साधला. दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉर प्रकल्पाच्या विस्तारासाठी आणखी आठ हजार एकर जमीन संपादित केली जाणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. या संवाद सत्रानंतर संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण झालं.

**<u>अपघात उपचार</u>**

अपघातग्रस्त रुग्णांसाठी एक लाख रुपयांपर्यंतचे रोखविरहीत उपचार अंगीकृत आणि अन्य तातडीच्या रुग्णालयांमधून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागानं कार्यवाही करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनांच्या कामकाजाचा आढावा आबिटकर यांनी काल मुंबईत घेतला, त्यावेळी ते बोलत होते. या योजनेतील अंगीकृत रुग्णालयांची संख्या 4 हजार 180 पर्यंत वाढवण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. योजनेतील रुग्णालयांची आणि खाटांच्या उपलब्धतेची माहिती देण्यासाठी तसंच तक्रारी नोंदवण्यासाठी स्वतंत्र मोबाईल ॲप विकसित करण्याचाही निर्णय यावेळी झाला. प्रत्येक अंगीकृत रुग्णालयानं दर महिन्याला एक आरोग्य शिबिर आयोजित करून किमान पाच रुग्णांवर कॅशलेस उपचार करावेत, अशा शिबिरात लोकप्रतिनिधींना सहभागी करून घेऊन त्याची पूर्वप्रसिद्धी करावी, असं आवाहन आबिटकर यांनी केलं.

**<u>क्रीडा पुरस्कार</u>**

आज क्रीडाक्षेत्र तांत्रिकदृष्ट्या तसंच शारीरिकदृष्ट्या अत्यंत स्पर्धात्मक झालं आहे. आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये यशस्वी होण्यासाठी मुलांना लहान वयापासूनच खेळांमध्ये सहभागी करून घ्यावं तसंच शाळा आणि पालकांनी मुलांना क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी प्रोत्साहन द्यावं असं आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. वर्ष 2022-23 आणि 2023-24 साठीच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांचं वितरण काल पुण्यात राज्यपालांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. 2022-23 चा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू प्रदीप गंधे यांना तर 2023-24 चा जीवनगौरव पुरस्कार माजी राष्ट्रीय कबड्डीपटू आणि संघटक शंकुतला खटावकर यांना प्रदान करण्यात आला. तसंच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केलेले खेळाडू, संघटक, प्रशिक्षक अशा 159 जणांचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारानं सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार विजेत्या खेळाडूंनी राज्यातल्या खेळाडूंना दिशा देण्याचं काम करावं असं आवाहन करुन मुख्यमंत्री म्हणाले....

**शिवछत्रपती पुरस्कार एक प्रकारे आपण केलेल्या मेहनतीला राजमान्यता आहे आणि शिवछत्रपतींचं नाव लागलं तर शांत बसताच येत नाही. त्यामुळे आपल्यापैकी प्रत्येकाला जो खेळाडू आहे त्याला खेळाडू म्हणून जो प्रशिक्षक आहे त्याला प्रशिक्षक म्हणून जो खेळाडू होता पण आता पुढे दुसऱ्या भूमिकेमध्ये जाणार आहे अशा प्रत्येकाला आपली भूमिका ठरवून खेळाच्या आणि खेळाडूंच्या विकासाकरता आम्हाला काय काय करता येईल त्याकरता आमचं पूर्ण कॉन्ट्रिब्युशन आम्ही देऊ हा पुरस्कार मिळाल्यानंतर छत्रपती शिवरायांनी ज्याप्रकारे या महाराष्ट्राला दिशा दाखवली तशीच महाराष्ट्रातल्या खेळाडूंना दिशा दाखवण्याचं काम सर्व पुरस्कार विजेत्यांनी करावं या सगळ्या खेळांमध्ये महाराष्ट्रच नंबर वन वर राहील अशा प्रकारचा संकल्प आपण सगळे मिळून आज घेऊया**

क्रीडा विभागाला पुरवणी मागण्यांमध्ये निधी वाढवून देण्यात येईल. पुरस्कारार्थींनी भावी खेळाडू घडवण्याचं काम करावं, राज्य खेळाच्या बाबतीतही अग्रेसर राहण्यासाठी प्रयत्न करावेत असं आवाहन करुन त्यासाठी राज्य शासन पाठीशी राहील, अशी ग्वाही अजित पवार यांनी दिली.

## तिळवाण-परभणी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या लातूर इथल्या तेलबिया संशोधन केंद्रानं विकसित केलेल्या तिळाच्या टीएलटी-10 या वाणाला क्षेत्रवाढीसाठी देशपातळीवर अधिकृत मान्यता मिळाली आहे. केंद्रीय कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या वाण अधिसूचना आणि प्रसारण समितीच्या बैठकीत ही मान्यता मिळाली. यामुळे टीएलटी-10 वाणाला खरीप तसंच रब्बी हंगामात महाराष्ट्रासह कर्नाटक, केरळ, आंध्रप्रदेश, तमिळनाडू, तेलंगण आणि गुजरात या राज्यांत लागवडीसाठी मान्यता देण्यात आली आहे. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात हे वाण अधिसूचित करण्यात आलं होतं. टीएलटी-10 वाण तीन महिन्यांत परिपक्व होतं आणि हेक्टरी 7 ते 8 क्विंटल इतकं उत्पादन मिळतं. या वाणामध्ये तेलाचे प्रमाण 45 पूर्णांक 2 दशांश टक्के आहे. तसंच विविध पीक रोगांचा तसंच पानं गुंडाळणारी आणि बोंड पोखरणारी अळी यांसारख्या कीटकांचा सामना करुन टिकून राहण्याची क्षमता यामध्ये आहे.

## चित्रपट

अग्निशमन सेवा सप्ताहानिमित्त अग्नीशमन सेवा संचालनालयाच्या कामकाजाचं दर्शन घडविणारा माहितीप-अग्नि सुरक्षा-सह्याद्री वाहिनीवर आज दुपारी साडेतीन वाजता प्रसारित होणार आहे. याची निर्मिती निर्माता-दिग्दर्शक जयू भाटकर यांनी केली आहे. अधिकाधिक लोकांनी हा माहितीपट अवश्य पाहावा असं आवाहन महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाचे संचालक संतोष वारीक यांनी केलं आहे.

## आयपीएल

आयपीएल क्रिकेटमध्ये, पंजाब किंग्जनं काल रात्री बंगळुरू इथं पावसामुळं व्यत्यय आलेल्या 14 षटकांच्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा 5 गडी राखून पराभव केला. विजयासाठी 96 धावांचं लक्ष्य पंजाब किंग्जनं 11 चेंडू राखून पूर्ण केलं.

## हवामान

राज्यात सध्या सगळीकडेच कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली आहे. आज सर्वत्र हवामान कोरडं असेल. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान असेल असा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.